'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
मराठी साहित्य संशोधन विशेषांक Vol. 2 Issue. 3
ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2015

# लोकसंस्कृतीतून लोकजीवनाचे संवर्धन

डॉ.भारती रेवडकर
प्रोफेसर व मराठी विभागप्रमुख,
पदवी व पदव्युत्तर केंद्र,पीएच्.डी. संशोधन सुविधा केंद्र,
श्री.शिवाजी महाविद्यालय, बार्शी.
महाराष्ट्र, भारत.

*आपल्या प्रत्येक सण-उत्सवातून जीवनास उपयुक्त असा संदेश मिळतो, उत्तम शिकवण त्यात असते. दया, क्षमा, शांती, प्रेम, त्याग, नीती यांची शिकवण छोटया छोटया कृती व प्रसंगामधून मिळते. प्रत्येक सण एक-एक संस्कार घडवतो. सण-उत्सवांमधून मिळणारी नैतिक शिकवण आजच्या जागतिकीकरण व चंगळवादाच्या युगात अत्यंत महत्वाची आहे. कौटुंबिक स्तरावर, सामाजिक स्तरावर व्यक्तीव्यक्तीत होणारे वैचारिक आदानप्रदान आपुलकी, सहानुभूती, प्रेममय भावभावना वाढीस लागण्यासाठी आवश्यक आहे. अशा सण उत्सवांमधून द्वेष भावना, मत्सर, क्रोध, लोभ या विकारांपासून मानवी मनाची सुटका होते. प्राणीमात्रांवर प्रेम, वृक्षसंवर्धन, पर्यावरण संवर्धन, राष्ट्रप्रेम आदि मानवी मूल्ये समाजात विकसित होण्यास चालना मिळते.*

लोकसाहित्य म्हणजे लोकमानसाची व्यक्तिगत आणि सामूहिक अशा दोन्हींची आत्मप्रकटीकरणाची प्रवृत्ती होय. शरिरविभ्रम, शब्द, भाषा व कृती या माध्यमातून लोकमानसाचे आत्मप्रकटीकरण होते. मराठी साहित्याचे संकलन आणि प्रकाशन प्रचंड प्रमाणावर होऊ लागले आहे. अनेक अभ्यासक लोकसाहित्यविषयक व्यापक दृष्टी ठेवून विशिष्ट भूप्रदेशातील लोकसाहित्याचे संकलन करून त्याचा शास्त्रीयअभ्यास करण्याचा प्रयत्न करत आहेत. लोकसाहित्य आणि लोकजीवन यांच्या अभिनत्वामुळे लोकसाहित्याच्या अभ्यासाला म्हणजेच पर्यायाने लोकजीवनाच्या अभ्यासाचे स्वरूप आपोआपच प्राप्त होते यात शंकाच नाही. आजच्या जागतिकीकरण व चंगळवादी युगात लोकसाहित्याचा म्हणजेच लोकजीवनाचा समाजशास्त्रीय व मानवशास्त्रीय दृष्टीचे अधिष्ठान ठेवून अभ्यास करणे गरजेचे झाले आहे. पिढयानपिढया मानव आपल्या क्रांतीकारी कृती व विचाराने नवनवीन जीवनप्रणालीकडे वाटचाल करण्याचा प्रयत्न करतो आहे. परंतु मानवी जीवनातील मूलभूत गरजा यामध्ये मानवी शरीराच्या अनुषंगाने बदल संभवत नाही. अन्न, पाणी, वस्त्र, निवारा या गरजा आहे तशाच रहाणार आहेत. मानवाचे मूलभूत विकार-आहार, निद्रा, भय आणि मैथून यामध्येही कधीच बदल संभवत नाही. मानवाची सामूहिक जीवनवृत्ती, मानवाला मिळालेली प्रगत वाचा, बुद्धि ही विकारतृप्तीची माध्यमे, तसेच मूलभूत विकारांतून निर्माण झालेल्या माणासाच्या आनंद, दु:ख, भय आदी मूलभूत भावना, त्याचे अनुभव स्पष्टीकरण करण्यासाठी उपयोजिलेली बुद्धि आणि वाच्या-शब्द, भाषा, प्रतीके यांच्या आधारे आज लोकमानसाला लोकजीवनात आवश्यक असलेली समाजविषयक स्थितीगती ज्ञात असणे गरजेचे आहे.

लोकसंस्कृती व आजची सामाजिक, मानसिक स्थिती, यांचा कुठेतरी मेळ असणे आवश्यक आहे. लोकसंस्कृतीपासून आज मानवी मन म्हणजेच पर्यायाने समाजमन दुरावत चाललेले दिसते. भौतिक साधनांचा अतिरेक समाजमानसाला क्षणोक्षणी मोहात अडकवून निराशेच्या गर्तेत ढकलताना दिसतो आहे. आज उच्चशिक्षित समाज आर्थिक सुबत्ता प्राप्त करून भौतिक साधनांच्या माध्यमातून सुखसुविधा मिळवू पाहतो आहे. याउलट मध्यम आर्थिक सबल समाज दैनंदिन जीवनात विविध टप्प्यांवर सुखाचे आशेवर जगतो आहे. तर दररोज काम करून पोट भरणारा वर्ग त्या त्या दिवशी पोट भरते आहे यावरच मनाला शांत करतो आहे. समाजातील या विविधवर्गांचे समाजशास्त्रीय व मानसशास्त्रीयदृष्टया अवलोकन केले तर आनंदापेक्षा दु:खाचा, ताणतणावाचा, निराशेचा, उदासिनतेचा, स्पर्धात्मक चढाओढीचा, विविध आजारांनी ग्रस्त असल्याचाच भाग अधिक दिसतो. लोकजीवन व लोकसंस्कृतीपासून दुरावणारा समाजातील प्रत्येक वर्ग यांत्रिकीकरण व भौतिक सुविधांच्या

अतिरेकीपणामुळे 'माणसातील माणूसकीला' विसरू लागला आहे. प्रत्येकजण 'मस' आणि 'उल ंिपसल' एवढाच विचार करतो आहे. लोकसंस्कृतीतील आपलेपण, जिव्हाळा, माया, ममता, प्रेम, दया, क्षमा, शांती, सहानुभूती इ. मूल्यांना तिलांजली देणारा समाज आज बहुसंख्येने अधोगतीकडे वाटचाल करतो आहे. परंतु आजही अनेक ठिकाणी लोकसंस्कृतीचा, परंपरेने आलेल्या विचारधारांचा, आचारांचा, मूल्यांचा विचार करणारी कुटुंबव्यवस्था टिकून आहे. अनेक उच्चशिक्षित, संशोधक, शास्त्रज्ञ, अभ्यासक मानवी मूल्यांना महत्व देवून, विनाशाचा आलेख लक्षात घेवून शांततेने व सामंजस्याने आपले जीवन लोकसंस्कृतीतील विविध घटकांच्या मदतीने जगत आहेत.

''कित्येक संस्कृती उलटून गेल्या- आणि नंतर आपल्याला स्थूलरूपाने माहित असलेल्या वैदिक, पौराणिक इ.संस्कृतीतून या प्रवाहित राहिल्या. या जीवन प्रवाहात जे जे त्यांना घ्यावेसे वाटले ते त्यांनी स्विकारले. नको वाटले ते कवटाळून न ठेवता सहज फेकून दिले. पण एक ध्येय समोर ठेवले. जीवनाला विन्मुख न होता जगायचे. मालनीचे ध्येय निसर्गाच्या प्रवाह धोरणाशी संबंद्ध असेच आहे. ही जी त्यांची संस्कृती आहे ती त्यांच्या जीवननिष्ठेतून निर्माण झालेली आहे. इतर कोणत्याही संस्कृतीपेक्षा या त्यांच्या जीवननिष्ठेतून निर्माण झालेली आहे. कित्येक संस्कृती उलटून गेल्या- आणि नंतर आपल्याला स्थूलरूपाने माहित असलेल्या वैदिक, पौराणिक इ.संस्कृतीतून या प्रवाहित राहिल्या. या जीवन प्रवाहात जे जे त्यांना घ्यावेसे वाटले ते त्यांनी स्विकारले. नको वाटले ते कवटाळून न ठेवता सहज फेकून दिले. पण एक ध्येय समोर ठेवले. जीवनाला विन्मुख न होता जगायचे. मालनीचे ध्येय निसर्गाच्या प्रवाह धोरणाशी संबंद्ध असेच आहे. ही जी त्यांची संस्कृती आहे ती त्यांच्या जीवननिष्ठेतून निर्माण झालेली आहे. इतर कोणत्याही संस्कृतीपेक्षा या त्यांच्या जीवननिष्ठ संस्कृतीचा प्रभाव त्यांच्यावर अधिक आहे''[१]

आजही तुळजाभवानी, ज्योतिबा, खंडोबा या कुलदैवतांचे दर्शन घेऊन आपला जीवनप्रवास करणारे असंख्य लोक आहेत. लोकसंस्कृतीतील सण-उत्सव वैज्ञानिक दृष्टीकोनातून साजरे करुन आनंद व समाधानाची लयलूट करणारे समाजमानव इतरांसाठी, समाजमानसासाठी कार्यरत आहेत. अंधश्रद्धेच्या आहारी न जाता श्रद्धेने आपली कृती करणारा समाजमानव विविध क्षेत्रात ताणतणावविरहित जीवन जगत आहे. जीवननिष्ठा, जीवनाभिमुखता आणि समृद्धीची इच्छा असणारा समाजमानव मानसिकदृष्टया सुदृढ समाजमानवाला लोकसंस्कृतीतील विविध घटक कधी प्रत्यक्ष तर कधी अप्रत्यक्ष सहाय्यभूत ठरतात असे म्हणणे सयुक्तीकच आहे.''लोकसाहित्य हा लोकजीवनाचा आविष्कार असतो. त्यात सातत्य, लवचिकता आणि चिरंतनत्व असते. लोकसाहित्य लोकजीवनाला स्वत:बरोबर नेते. तसेच त्याचा प्रवास लोकजीवनाबरोबरच प्रगमनशील असतो. ---- 'लोक' म्हणजे एकत्रितपणे जास्तीतजास्त सुखकर जीवन जगण्यासाठी एकत्र आलेला माणसांचा समुदाय, हा समुदाय समानमनस्क असतो. जीवन अधिक सुखकर किंवा सहज बनविण्यासाठी चाललेल्या धडपडीतून बोलभाषा आणि लालित्य व त्यातूनच क्रमाने लोकवाङमयाची निर्मिती झाली असे म्हणता येईल.लोकसाहित्यात म्हणूनच मानवाच्या पुरातन लोकजीवनदर्शनाचे अवशेष तर सापडतातच परंतु नवनवीन गोष्टी सहज सामावल्या जातात. म्हणूनच लोकसाहित्य परंपरेतून प्रवाहित असले तरी ते नेहमी वर्तमान असते.''[२]

लोकसाहित्य परंपरांच्या प्रवाहांमधून आलेले असताना लोकसंस्कृती व वर्तमान जीवन यांच्या संयोगातून आत्मगत जाणीवांतून नव्याने अविष्कृत होत असते आणि त्याचवेळी नवजीवनाच्या नव्या जाणीवा आपोआप व्यक्ती वा समूहाकडून आविष्कृत होतात. लोकसंस्कृतीतून, लोकसाहित्यातून संस्कृतीचे अभिसरण त्रग्गोचर होते. लोकमानस ज्या ज्या विविध माध्यमातून अभिव्यक्त होते त्यामध्ये लोकमानसाच्या शब्दबद्ध अविष्काराबरोबरच लोकरुढी, लोकविश्वास, विधी, सण-उत्सव इ.चा समावेश होतो. म्हणजे एकूणच लोकधर्म व लोकसंस्कृती यांचा अभ्यास म्हणजे लोकसाहित्याचा अभ्यास होय.

ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2015

जीवनात 'आनंद' अनुभवणे ही प्रत्येक माणसाची जनसमूहाची गरज असते. लोकसंस्कृतीत अनेक सणउत्सवांची रेलचेल आहे. सर्वसामान्य माणसाला आपल्या घरी अधूनमधून आनंदोत्सव साजरा करावा असे वाटते. ऋतुमानाप्रमाणे आपल्या संस्कृतीत सणउत्सवांचे नियोजन असल्याने यामधून आनंदाची लयलूट अनुभवता येते. समाजमानव आपली हौसमौज सणउत्सवांना साजरे करून उपभेगतो आणि घराण्यातील वाडवडिलांनी सणउत्सवाच्या माध्यमातून जोपासलेला कुळाचारही पाळतो. यामुळे आपल्या सभोवतालचे वातावरण प्रसन्न राहते व जीवनात उत्साह निर्माण होतो. घरादारावर, मुलाबाळांवर चांगले संस्कारही घडतात. वस्त्रालंकार, गोडधोड जेवण, देवतांची विधियुक्त पूजा, नृत्यगीते, खेळगीते इ. चा सणउत्सवप्रसंगी असलेला आविष्कार व अनुभूती समाजमानवाल अधिक आनंदी व समाधानी करतो. कुळाचारांची सवय, देवादिकांची आवड, पूजाविधिची हौसमौस यांचीही समाजमानवाची कृतियुक्त आचारधारा तृप्त होते यातूनच सदाचार, सद्वर्तन, सदविचारांची बीजे पेरली जातात व लोकमानसाची जडणघडण होते.

भारतीय लोकजीवनात चैत्र महिन्यात नवे वर्ष चालू होते यालाच वर्षप्रतिपदा म्हणतात. यादिवशी समाजमानव कूलदेवतेची पूजा करून कडूनिबांचा पाला खातात. एकमेकांना भेटून सुसंवाद करून आनंदी वातावरणाचा लाभ सर्वांना मिळतो. याच महिन्यात रामजन्म साजरा करण्यासाठी रामनवमीचा सण येतो. वैशाख महिन्यात शुद्ध तृतीयेदिवशी अक्षयतृतीया येते. हा दिवस उत्तम मानून चांगल्या कार्याची सुरुवात करतात तसेच या दिवसाला पितृतिथी मानून आपल्या कुवतीनुसार अन्नदान व इतर वस्तुंचे दान करतात. जेष्ठ महिन्यातील पोर्णिमेस वटपोर्णिमा म्हणतात. अखंड सौभाग्यप्राप्तीसाठी हिंदू स्त्रिया सावित्रीव्रत करतात. वडाच्या झाडाची पूजा करून स्त्रिया एकमेकींना आंबे दान करून ओटी भरतात. आषाढ महिन्यातील महाएकादशी हा हिंदू लोकांमध्ये उपवासाचा दिवस असतो. पंढरपूरच्या विठ्लाची पूजा करून दर्शन घेतात. पंढरपूरला मोठी यात्रा भरते. दर्शन, दिंडी व वारीचा आनंद मोठया संख्येने समाजमानव घेतो. श्रावणमहिन्यात शुद्ध पंचमीला पर्यावरण संतुलनास मदत करणाऱ्या नागाची स्त्रिया पूजा करतात. यालाच नागपंचमी म्हणतात. नारळीपौर्णिमा व रक्षाबंध, गोकुळाष्टमी हे सणही श्रावण महिन्यातच येतात. रक्षाबंधनाला हातात राखी बांधतात व नारळीपोर्णिमेला समुद्रास नारळ अर्पण करतात. गोकुळाष्टीमीला कृष्णजन्म साजरा करतात. भाद्रपद महिन्यात गणपती उत्सव, गौरीचा सण साजरा होतो. अश्विन महिन्यात नऊ दिवस देवीचा उपवास करतात. नवरात्रीच्या सुरवातीला घटस्थापना करून शेवटच्या दिवशी दसरा हा सण साजरा केला जातो. यालाच विजयादशमी असेही म्हणतात. यादिवशी शमीपूजन करून शमीची म्हणजेच आपटयाची पाने सोने म्हणून लुटतात. याच दिवशी पोट भरण्याचे साधन असलेल्या साधनांची पूजा करतात. हा दिवस उत्तम समजून नवीन कार्याला आरंभ करतात. सरस्वतीची पूजाही करतात. अश्विन महिन्यातील वद्य त्रयोदिशीपासून दिवाळी हा सण पाच दिवस साजरा करतात. पहिला दिवस धनत्रयोदशी दिवशी प्रात:काळी गाईची पूजा व सायंकाळी धनाची पूजा करतात. तिसऱ्या दिवशी अमावस्येला सर्वजण लक्ष्मीपूजन करतात. व्यापारी व सावकार लोक आपापल्या जमाखर्चाच्या वहयांची पूजा करतात. व 'इडापिडा जावो आणि बळीचा राज्य येवो' अशी प्रार्थना करून घरातील सर्व केरकचरा उकीरडयावर नेऊन टाकतात. पाचव्या दिवशी यमद्वितीयेला भाऊबीज साजरी होते. संपूर्ण दिवाळीत गोडधोड फराळाचे पदार्थ, पंचपक्वाने, उंची व नवीन वस्त्रालंकार, फटाके, पहाटेचे अभ्यंगस्नान दिवे व आकाशकंदिल, सडारांगोळी, दाराला तोरण, विविध पूजाविधी, घरातील सर्वांना औक्षण इ. रितीरिवाज केले जातात. जनसमूहात या काळात अत्यंत आनंदाचे व मांगल्याचे वातावरण असते. फाल्गून महिन्यात शुद्ध पोर्णिमेस होळीचा सण साजरा केला जातो. सायंकाळी होळीची पूजा करून, पुरणपोळीचा नैवेद्य दाखवून पूजा केली जाते. याच काळात रंगपंचमीही उत्साहाने साजरी करतात.

हे सर्वसण येथे प्रातिनिधिक स्वरूपात सांगितले आहेत. वर्षभर आजून छोटेमोठे सण साजरे केले जातात. बैलपोळा या दिवशी बैलांची पूजा करून त्यांना पूरणपोळी खाऊ घालतात. बैलपोळा श्रावण किंवा भाद्रपद महिन्याच्या अमावस्येला विविध प्रांतात साजरा करतात. या सणांच्या नावांमध्ये, साजरा करण्यामध्ये विविध ठिकाणी वेगवेगळया पद्धती आहेत. या सण-उत्सवांचे पारंपरिक हेतू व वैज्ञानिक हेतू ही आहेत. त्या त्या सणादिवशी वेगवेगळया विधींमधून ते प्रकट होतात. संक्रातसारख्या सणादिवशी एकमेकांना तिळगूळ देवून स्त्रिया विविध वस्तूही दान करतात. श्रद्धा, परंपरा व चालिरितींचे पालन, एकमेकांविषयी प्रेम, आस्था, सुसंवाद निर्माण करणे तसेच शास्त्रीयदृष्टया त्या त्या सणांदिवशी त्या त्या ऋतुला आवश्यक आहारविहार घेणे हे आपोआपच लोकजीवनात घडते. या सणउत्सवांच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिक आणि सहजीवनाची भावना वाढीस लागते. एकमेकांच्या आदराच्या भावनेचे जतन यातून केले जाते. जात, पंथ आणि द्वेषरहित वातावरणात हे सणउत्सव साजरे केले जातात व त्यातूनच एकात्मता, सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता इ. चे दर्शन घडते.

गणपतीउत्सव, गौरीउत्सव, दिवाळी इ. सणांप्रसंगी मुले व स्त्रिया विविध देखावे बनवतात. दिवाळीत लहान मुले किल्ले बनवतात. सर्जनशीलतेला वाव मिळून त्यातून नवनवीन कल्पनांचा उगम होतो व यातूनच नवनिर्मिती होवून सर्वांना आनंद मिळतो. लहान थोरांच्या कल्पनाशक्तिला, प्रतिभाशक्तिला व नवनिर्मितीला एक वेगळाच आयाम प्राप्त होतो. दिवाळीत आकाशकंदिल व दिव्यांची सजावट, आकर्षक भेटकार्ड बनविणे, फुलांचे हार व तोरणे बनवणे, आकर्षक रांगोळया काढणे, किल्ले तयार करून त्यावर आकर्षक मांडणी करणे, विविध प्रसंगातून सर्वजण आनंदी व प्रसन्न मनाने एकमेकांशी सुसंवाद साधतात. या काळात दु:ख, उदासिनता, ताणतणाव, निराशा यांना स्थान न देता सर्वजण एकमेकांत आनंदाची लयलूट करतात. या अनुषंगाने डॉ.उषा देशमुख लिहितात,''मानवी जीवनात सण, उत्सव, समारंभ यांना अतिशय लक्षणीय स्थान आहे. माणसामाणसाला सांस्कृतिकदृष्टया आणि धार्मिकदृष्टया एका सूत्रात बांधण्याचे काम, विशिष्ट जीवन व्यवहाराचा एकसंघपणा टिकविण्याचे काम, अशा प्रकारच्या विविधपरंपरामधून केले जाते हे आपणास महाभारत, रामायणापासूनही दिसून येते. मानवाच्या बौद्धिक आणि भावनिक आविष्कारातून विशिष्ट सण आणि उत्सव यांची ऋतुकाळनिष्ठ आणि देशपरिस्थितीनिष्ठ अशी निर्मिती झाली आहे. त्या निर्मितीतूनही मानवी जीवनाची विकसनशीलता आणि सांस्कृतिक प्रगती यांचे दर्शन घडत असते. एकीकडे परंपरा टिकविण्याचे कार्य आणि दुसरीकडे बदलत्या कालमानाप्रमाणे परंपरेत पूरक व उपयोजित बदल घडवून आणण्याचे कार्य सातत्याने संस्कृतीतून होत असते. व्यक्ती, कुटुंब, समाज आणि समष्टी यांना एका विशिष्ट नियमनात बांधून ठेवण्याचे उद्दिष्ट सण व उत्सवांच्या निर्मितीतून पूर्ण होत असते.''[३]

RESEARCH JOURNEY

वर्षभरातील सर्व सणउत्सवांतून मानवी जीवनाच्या सर्व कक्षांचा विचार आलेला दिसतो. व्यक्ती स्वातंत्र्य, सामाजिक बांधिलकी, कुटुंबव्यवस्थेतील विविध घटक, संस्कृतीची विविध वैशिष्टये इ. चा एकत्रित मिलाफ विविध सणउत्सावांतून जनसमूहाला प्रत्ययास येतो. यातूनच सांस्कृतिक महत्व आणि विधींविषयीची श्रद्धा यांचाही प्रत्यय येतो. विविध विधींच्या आचरणातून समाधान, मन:शांती दानधर्म, जनकल्याणाची भावना, आनंददायी वृत्ती यांचा लाभ होवून प्रत्येक व्यक्ती सामाजिक व मानसिकदृष्टया सदृढ व निरोगी होऊन जीवन जगण्याच्या प्रबळ इच्छेने मार्गक्रमण करते. मानवी आचार, विचार व व्यवहार सुलभ होतात. लोकसंस्कृतीतील सातत्य व विकसनशीलता मानवाला अत्युच्च आनंद व समाधान देते. जीवनसरणीच्या सकारात्मकतेला मानवी जीवनात अग्रक्रमाने प्राधान्य मिळते. दैनंदिन जीवनातील विविध सुंदर क्षण, सुंदर वातावरण यांचा आस्वाद घेण्याची क्षमता वाढते आणि मानव वेगाने प्रगतीच्या दिशेने वाटचाल करू शकतो.

**निष्कर्ष**- आपल्या लोकसंस्कृतीतून लोकजीवनासाठी नेम-नियमनांची शिकवण मिळते. आपल्या प्रत्येक सण-उत्सवातून जीवनास उपयुक्त असा संदेश मिळतो, उत्तम शिकवण त्यात असते. दया, क्षमा, शांती, प्रेम, त्याग, नीती यांची शिकवण छोटया छोटया कृती व प्रसंगामधून मिळते. प्रत्येक सण एकएक संस्कार घडवून देतो. असे विविध सण विविध संस्कार घडवतात. सण-उत्सवांमधून मिळणारी नैतिक शिकवण आजच्या जागतिकीकरण व चंगळवादाच्या युगात अत्यंत महत्वाची आहे. कौटुंबिक स्तरावर, सामाजिक स्तरावर व्यक्तीव्यक्तीत होणारे वैचारिक आदानप्रदान एकात्मतेची भावना बळकट करते आणि आपुलकी, सहानुभूती, प्रेममय भावभावना वाढीस लागतात. द्वेष भावना, मत्सर, क्रोध, लोभ या विकारांपासून मानवी मनाची सुटका होते. प्राणीमात्रांवर प्रेम, वृक्षसंवर्धन, पर्यावरण संवर्धन, राष्ट्रप्रेम यांनाही चालना मिळते. अशा निरोगी वातावरणात समाजमनाचे शारिरीक व मानसिकदृष्टया आरोग्य उत्तम रहाते. आजच्या ताणतणाव व स्पर्धेच्या, धावपळीच्या जगात लोकसंस्कृतीचे संवर्धन करून लोकमानसाचेही संवर्धन होते. लोकसंस्कृतीतील सण-उत्सव आजच्या परिस्थितीनुरूप कोणताही अतिरेक न करता, श्रद्धेने साजरे केले तर सामाजिक वातावरण व कौटुंबिक वातावरण आनंददायी होईल असे म्हणणे सयुक्तिकच ठरेल.

**संदर्भ-**

१. इंगोले, प्रतिमा, लोकसंस्कृती आणि स्त्रीजीवन, दिलीपराज प्रकाशन, पुणे,२००३,पान नं १६
२. सहस्त्रबुद्धे, अनिल, लोकसाहित्यविचार, सविता प्रकाशन औरंगाबाद, पान नं ३१,३२
३. बाबर सरोजिनी (संपा.), सण-उत्सव, महाराष्ट् राज्य लोकसाहित्य समिती, १९८८,पान नं.१४५